## ❖ 5वे बालकुमार साहित्य संमेलन अकोल्यात :

1. विदर्भ साहित्य संघाचे 5 वे बालकुमार साहित्य संमेलन दि. 1 व 2 डिसेंबर रोजी साने गुरुजी साहित्य नगरी, प्रभात किड्स स्कूल परिसर, वाशीम रोड, अकोला येथे संपन्न होत आहे.
2. या साहित्य संमेलनाचे साजेशे बोधचिन्ह दैनिक सकाळमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या रंगीबेरंगी या सदरचे स्तंभ लेखक तसेच सुप्रसिद्ध व्यंगचित्रकार गजानन घोंगडे यांनी उत्कृष्ट कॅलिग्रॉफीच्या आधारे जुन्याकाळातील शाळेत उपयोगात येणारी पाटी व त्यावर '5 वे बालकुमार साहित्य संमेलन' असे लिहीलेली अक्षरे, छोटी मुले आणि पुस्तक असे त्याचे एकंदरीत स्वरुप आहे.
3. जुन्या काळी प्राथमिक शिक्षणात पाटी फार महत्वाची होती. 'शाळा सुटली, पाटी फुटली आई मला भूक लागली'अशा आशयाच्या कवितेच्या ओळी प्रसिद्ध होत्या.

❖ आज मात्र मोबाईल आणि व्हॉटसअॅपच्या अधिन गेलेल्या पिढीला कदाचित पाटीचा गंधही नसेल. मात्र पारंपारिकता आणि नवता याचा सुयोग्य मेळ घालणा-या 5 व्या बालकुमार साहित्य संमेलनाचे बोधचिन्हकार गजानन घोंगडे म्हणतात, 'कुठलीही कलाकृती ही शैलेंद्रच्या गाण्यांसारखी सहज-सोपी, कुणालाही गुणगुणता येणारी, परंतु अर्थपूर्ण असावी' या त्यांच्या वडीलांच्या शिकवणीला अनुसरून असे सोपे संमेलनाचे बोधचिन्ह साकारले आहे.

## ❖ केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या अग्रीम रक्कम मर्यादेत वाढ :

- मोदी सरकारने केंद्रीय कर्मचाऱ्यांसाठी हाऊस बिल्डिंग अॅडव्हान्स रुल्सचे नूतनीकरण केले आहे. यामध्ये सातव्या वेतन आयोगाच्या शिफारशींचाही अंतर्भाव केला आहे. त्यामुळे आता सरकारी कर्मचाऱ्यांना नवे घर घेण्यासाठी 25 लाख रुपयांची उचल घेता येणार आहे. यापूर्वी ही मर्यादा साडेसात लाख रुपयांपर्यंत होती. याचाच अर्थ पूर्वीच्या मर्यादेत 350 टक्क्यांची वाढ करण्यात आली आहे.
- केंद्र सरकारतर्फे जारी करण्यात आलेल्या निवेदनानुसार सरकारी कर्मचाऱ्यांना आता घराच्या बांधकामासाठी किंवा नवीन फ्लॅट घेण्यासाठी 34 महिन्यांच्या मूळ वेतन उचल म्हणून देण्यात येणार आहे.
- मात्र, त्याची कमाल मर्यादा 25 लाख रुपयेच असणार आहे. या शिवाय घरातील अतिरिक्त बांधकामासाठी दहा लाख रुपयांची उचल मिळणार आहे. यापूर्वी केवळ 1.80 लाख रुपयांची उचल देण्यात येत होती.